**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२५/अग्रहायण १७, १९४७ (शके)**

## :: औचित्याचे मुद्दे स्वीकारणे व त्यावरील कार्यवाही ::

१४३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार औचित्याचे मुद्दे **PROIS** या संगणक प्रणालीव्दारे संपूर्णत: ऑनलाईन (**online**) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. औचित्याच्या मुद्दयाबाबतची बाब दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आली असेल त्याच दिवशी मा. सदस्यांना जो औचित्याव्दारे मुद्दा उपस्थित करावयाचा असेल तोच मुद्दा त्यांनी **PROIS** या संगणक प्रणालीव्दारे संपूर्णत: ऑनलाईन (**online**) पध्दतीनेच सकाळी ७.३० ते ०९.३० वाजेपर्यंत या सचिवालयाकडे पाठवावा ऑफलाईन (**Offline**) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या औचित्याच्या मुद्यांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही. **औचित्याचा मुद्दा सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक असून औचित्याच्या मुद्दयाच्या सूचनेचे प्रारुप जास्तीत जास्त १५० ते १७५ शब्दांच्या मर्यादेतच असावे.**

सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेल्या मुद्द्यांपैकी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी मान्य केलेल्या मुद्दयांचे सकाळी १०.३० वाजता तसेच मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार सचिव- २ यांच्या कार्यालयात बॅलट काढण्यात येईल व एका वेळी एकूण २५ मुद्दे सदस्य निहाय घेण्यात येतील. **तसेच सन्माननीय सदस्यांनी संगणकीय प्रणालीव्दारे सादर केलेला व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी मान्य केलेला एकच मुद्दा सभागृहात उपस्थित करणे आवश्यक आहे. एका पेक्षा अधिक व एका पेक्षा अधिक विभागांशी संबंधित असलेला मुद्दा ग्राहय धरण्यात येणार नाही.**

बॅलटमध्ये आलेल्या २५ औचित्याच्या मुद्दयांची सूची सचिव- २ यांच्या दालनात तसेच जेथे सन्माननीय सदस्यांचा उपस्थिती पट ठेवण्यात येतो तेथे ठेवण्यात येईल. बॅलटमध्ये आलेल्या सन्माननीय सदस्यांनी त्याच दिवशी औचित्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित न केल्यास तो मुद्दा व्यपगत समजण्यात येईल व त्यावर पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**विधान भवन,**
**नागपूर**
**दिनांक :०८ डिसेंबर, २०२५**

**मेघना तळेकर,**
**सचिव - २**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव- १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) सचिव- २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६) सचिव- ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
७) सचिव- ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
१०) संगणक कक्ष (**WEBSITE**)
११) एम.के.सी.एल.